# ई-निविदा सुचना

नगरपरिषद लोणार जि. बुलढाणा

कर विभाग

ई-निविदा सूचना क्र.०१/२०२६-२७

मुख्याधिकारी, लोणार नगर परिषद वतीने नोंदणीकृत व अनुभवी कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता गुणवत्तेच्या आधारे ई -निविदा (दुसरी वेळ) प्रणालीद्वारे (ऑनलाईन) दरपत्रक मागवित आहेत. इच्छुक निविदा धारकांनी आपली ई-निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑन-लाईन पध्दतीने निविदा फी व ईसारा रक्कम ऑनलाईन नेट बँकींग सुविधेव्दारे भरणा करुन संपुर्ण अर्हता दस्ताऐवजांसह विहीत मुदतीत सादर करावी. निविदे संदर्भात संपुर्ण कामाचे सविस्तर विवरण, निविदा शुल्क, अटी व शर्ती तसेच नोंदणी व पात्रता निकष ऑनलाईन निविदा संचीकेत उपलब्ध करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | काम करण्याचा कालावधी | निविदा अनामत रक्कम | निविदा प्रपत्र किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१ | नगर परिषद हद्दीतिल संपुर्ण मिळकतीना (इमारती व खुले भुखंड) प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीला विशिष्ठ क्रमांक नोंदविणे, मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीचे आतुन मोजमाप करणे, करण्यात आलेल्या मालमत्तेच्या प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे संगणकीय अद्यावतीकरण करुन माहीती तयार करणे, सर्वकष कर मुल्यांकन प्रक्रिये करिता मदत करणे, मालमत्तेची नोंदविण्यात आलेली माहिती IWBP पोर्टल वर अद्यावत करून देणे, कर मुल्यांकन प्रक्रिये करिता आवश्यक नमुन्यात माहिती प्रिंट करुन आवश्यक स्टेशनरी व बाईडिंगसह पुरविणे इत्यादी कामाकरिता सहाय्य करणे. | ०६ महीने | १,५०,०००/- | ५०००/- |

निविदेचा तपशील :-

| अ. क्र. | निविदेचे विवरण | सुरू दिनांक व वेळ | अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| ०१ | निविदा प्रसिद्ध | दि. १४ /०५/२०२६ दुपारी ०४:०० वाजता | - |
| ०२ | निविदा कागदपत्रे डाउनलोड करणे | दि. १४ /०५/२०२६ दुपारी ०४:०० वाजता | दि. २९ /०५/२०२६ दुपारी ०५:०० वाजेपर्यंत |
| ०३ | ऑनलाइन निविदा सादर करणे | दि. १४ /०५/२०२६ दुपारी ०४:०० वाजता | दि. २९ /०५/२०२६ दुपारी ०५:०० वाजेपर्यंत |
| ०४ | निविदा उघडणे | दि. ०१ /०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता (शक्य असल्यास) | - |

टिप : कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद लोणार**

❖ ई-निविदा/लिफाफा पध्दतीसाठी माहीतीपत्रक व सामान्य अटी:

ई-निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी पात्र / इच्छुक निविदाधारकांनी स्वतः http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केली पाहिजे

१. निविदा उघडण्याच्या दिनांकापासुन निविदेची वैधता ९० दिवस असेल, अपूर्ण निविदा रद्द करण्याचा अधिकार मुख्याधिकारी, नगरपरिषद लोणार राखून ठेवत आहे.
२. कंत्राटदाराला आपल्या कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
३. निविदा प्रपत्राची किंमत व अनामत रक्कम ही निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत ऑनलाईन जमा केलेली असावी. जमा केलेली पावती निविदा कागदपत्रासह सादर करावी.
४. अनामत रक्कम अयशस्वी निविदा धारकास निविदा प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर परत केल्या जाईल.
५. निविदेबाबत कोणतेही कारण न देता कोणतीही एक अथवा सर्व ई निविदा स्वीकारण्याचा तसेच रद्द करण्याचा अधिकार मुख्याधिकारी, लोणार नगर परिषद यांनी राखुन ठेवलेला आहे.
६. ई निविदेमध्ये नमुद केलेले काम हे कार्यदिश मिळाल्याच्या दिनांकापासुन सहा महीन्यात करणे बंधकारक राहील. आवश्यकतेनुसार मुख्याधिकारी यांना मुदतवाढ देता येईल.
७. कंत्राटदारास कामाचे देयक यासोबत जोडलेल्या अनुसूची प्रमाणे अदा करण्यात येईल.
८. कंत्राटदारास ५०% देयक कलम ११९ च्या नोटिस वाटप नंतर प्राप्त होणाऱ्या मालमत्ता कराच्या रकमेतून अथवा या कामी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानातून निधी उपलब्धतेनुसार अदा करण्यात येईल. उर्वरित ५०% देयक कर आकारणी नंतर कलम १६९ नुसार प्राप्त होणाऱ्या अपील अर्जाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या मालमत्ता कराच्या रकमेतून अथवा या कामी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानातून अदा करण्यात येईल.
९. कंत्राटाद्वारे यापुर्वी यशस्वीरित्या केलेल्या प्रकल्पाचे सादरीकरण मुख्याधिकारी यांच्या समक्ष करणे आवश्यक आहे.जर कंत्राटाद्वारे केलेले सादरीकरण हे समाधानकारक नसल्यास निविदा भरता येणार नाही.
१०. कंत्राटदाराने शासनाने त्यांच्याकरीता आकारण्यात आलेले सर्व कर, फी व इतर लागु देय वेळोवेळी भरलेले असावेत.
११. कंत्राटदाराने सर्व कामे मुख्याधिकारी लोणार नगर परिषदद्वारे देण्यात आलेल्या सुचना व नियमावलीच्या अधीन राहुनच पुर्ण करावीत.
१२. निविदा धारकास प्रस्तावित कामाबाबत माहिती नगर परिषदच्या पुर्व परवानगी शिवाय वितरीत अथवा प्रकाशित करता येऊ शकणार नाही.
१३. कंत्राटाद्वारे सादर केलेले दर हे जि.एस.टी व सर्व करांसह असावेत.
१४. निविदे मधील विहित मुदतीत कामे पूर्ण केली नसल्यास मुदत संपल्यापासून पुढे होणाऱ्या विलंबासाठी प्रती दिवस दंड रक्कम रु. २०००/- कंत्राटदारास आकारण्यात येईल.
१५. निविदाधारकाने खाली दर्शविलेल्या पद्धती प्रमाणे निवेदेसाठी कागदपत्रांचे स्कॅन करून ई-निविदेसोबत सादर करणे तसे माहितीसाठी प्रत सादर करणे गरजेचे आहे.
१६. नगर परिषद कर संकलन विभागाव्दारे कर आकारणीच्या कामाबाबत वेळोवेळी केल्या जाणाऱ्या सुधारणा निविदा धारकाने वेळेत पूर्ण करून देणे बांधणकारक आहे.
१७. नगर परिषदने वेळोवेळी कामाच्या स्वरूपात केलेले बदलानुसार निविदा धारकास काम करून देणे बंधनकारक राहील.
१८. नगर परिषदने कंत्राटदारासोबत केलेला करार हा कार्यादेशाच्या तारखेपासुन ०६ महिन्याचा असेल. यामध्ये मुदतवाढ देण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांना असतील.
१९. कराराच्या सर्व अटी व शर्तीसह निविदाकारांशी परम्पर सल्लामसलत करुन मुख्याधिकारी सदर करार जास्तीत जास्त दोन वर्षासाठी मुदत बाढवू शकतात.
२०. कामाच्या व्याप्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार नगर परिषदने राखून ठेवलेले आहे.
२१. सदर काम विहित कालावधीत पूर्ण करणे गरजेचे असल्याने ई-निविदेमध्ये सर्वात कमी दराची निविदा सादर करणाऱ्या निविदाधारकाने सादर केलेल्या दरामध्ये इतर निविदाधारक काम करण्यास तयार असल्यास सदर काम निविदाधारकांमध्ये विभागून देण्यात येईल.

२२. निविदाधारकांमध्ये काम विभागून दिल्यास कंत्राटदाराने केलेल्या कामाच्या प्रगती आणि गुणवत्ते नुसार निविदाधारकांना विभागून दिलेले काम कमी जास्त करण्याचा अधिकार मुख्याधिकारी, नगरपरिषद लोणार यांनी राखून ठेवला आहे.

❖ निविदा सादर करणेः

सर्व निविदाकारांनी आपली निविदा सर्व कागदपत्रानीशी ऑनलाईन www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भरावी.

❖ निविदेनुसार करावयाची कामे व पुरवठा :

नगर परिषद लोणार हद्दीतील अंदाजे एकुण मिळकती नविन सर्वेक्षणाप्रमाणे ८००० होण्याची शक्यता आहे. निवड झालेल्या निविदा धारकामार्फत प्रत्येक मिळकतीना विशिष्ठ क्रमांक देणे, नगर परिषद मेहकर हद्दीतिल संपुर्ण मिळकती (इमारती व खुले भुखंड) चे प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन मिळकतीचे आतुन मोजमाप पेऊन सर्वेक्षण करन सर्वेक्षणाची माहिती तयार करणे, सर्वेक्षणा दरम्यान गोळा केलेल्या माहितीचे संगणक आज्ञावलीत अद्यावतीकरण करणे जुना मिळकत क्रमांक व जुन्या करांची नविन करण्यात आलेल्या मिळकत सर्वेक्षणाशी जोडणी करतो, निविदा धारकाकडून कारण्यात आलेल्या प्रत्येक मिळकतीची डिजिटल फोटोची मिळकतीशी संगणक आज्ञावलीमध्ये जोडणी करणे, मिळकतीच्या सर्वेक्षणादरम्यान काढण्यात आलेल्या नकाशाचे डिजिटल नकाशे बनविणे, डिजिटल नकाशाची संगणक आज्ञावलीत मिळकतीशी जुळवणी करणे, नगर परिषदने किंवा शासनाने ठरविलेच्या करमूल्यांकन पद्धतीने करमूल्यांकन करुन माहिती तयार करुन देणे, सर्वेक्षणाव्दारे गोळा केलेल्या माहितीचे अद्यावतीकरण केल्यानंतर करमूल्यांकनाचे गुणांकन करण्याकरिता स्वयं संगणक आज्ञावली करण्यास सक्षम असायला पाहिजे. निविदा धारकाने नगर परिषदने सांगितलेल्या नमुन्यामध्ये माहिती प्रिंट करुन आवश्यक स्टेशनरी व बाईडिंगमह पुरविणे तसेच IWBP पोर्टलवर अद्यावत करून देणे इत्यादी कामाकरिता नगर परिषदला सहाय्य करणे इत्यादि कामे कंत्राटदारास करणे आवश्यक असेल.

नियुक्त करण्यात येणा-या निविदा धारकास लोणार नगर परिषदचे मुख्याधिकारी यांनी दिलेल्या संबंधीत कामाबाबतच्या सुचना, वेळोवेळी देण्यात आलेल्या मार्गदर्शना प्रमाणे काम पूर्ण करावे लागेल. करारनाम्यामध्ये नमुद केलेल्या इतर सर्व नियम व अटी निविदा धारकास बंधनकारक असतील आणि कामाच्या व्याप्तीचा भाग असतील.

अ) मालमत्ता कर विभागाकरीता करावयाची कामे:

१) मिळकतींना विशिष्ठ क्रमांक देणे:-

a. नगर परिषद हद्दीचा भौगोलिक नकाशा तयार करण्याकरीता नगर परिषद हद्दीमध्ये UAV Drone उडवून मालमत्तांचे व जमिनीचे हवाई छायाचित्र काढून नगर परिषद हद्दीचा भौगोलिक नकाशा तयार करून देण्यात यावा.

b. नकाशावर नगर परिषदची हद्द आखणी, कर विभागाकरिता प्रभागाची आखणी नकाशावर करुन देण्यात यावी.

c. प्रत्येक मिळकतीला क्रमांकन करण्याकरिता प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीला विशिष्ठ क्रमांक देण्यात यावा.

d. मिळकतीमध्ये ज्या मिळकती सार्वजनिक वापर, करमुक्त मिळकती, शासकिय, निम शासकिय, औद्योगिक, निवामी व अनिवासी इ. मिळकतीना सुद्धा क्रमांकन करण्यात यावे.

e. क्रमांकन करतांना मिळकतीची जुन्या व नविन मिळकतीची नोंदवही तयार करणे व प्रत्येक मिळकतींना नव्याने क्रमांकन करण्यात यावे.

f. नविन नंबरची आखणी भौगोलिक नकाशावर करून प्रभाग दर्शक नकाशा व संपुर्ण शहराचा नकाशा तयार करून नगर परिषदेस सुपूर्द करणे.

g. निवड करण्यात आलेल्या निविदा धारकामार्फत नगर परिषदला आवश्यक असलेला इतर माहिती जसे सोलार सुविधा, रेन वॉटर हार्वेस्टिंग सुविधा, लिफ्ट बाबत माहिती, विहिर, हातपंप, अग्नि सुरक्षा सुविधा संबंधीत माहिती गोळा करणे.

h. नगर परिषद मधील कर विभाग प्रमुख यांच्या सहाय्याने नगर परिषद हद्दितिल शासनाच्या नियमाप्रमाणे झोन निश्चित करून त्याचा नकाशा बनविणे.

२) मिळकतीचे सर्वेक्षण करुन माहिती गोळा करणे:-

a. नगर परिषद हद्दीतिल प्रत्येक मिळकतीचे (इमारती व खुले भुखंड) पारंपारिक पद्धतीने सर्वेक्षण करण्याकरिता नगर परिषदेस सहाय्य करण्यात यावे.

b. मुख्याधिकारी यांनी दिलेल्या निर्देश व नियमांनुसार निविदा धारकांनी सामाजिक, आर्थिक सिमांकन करून झोन निश्चित करणे. निश्चित करण्यात आलेल्या झोन च्या आधारे आकलनाने नगर परिषद हद्दीतिल मिळकती (इमारती व खुले भुखंड) जुन्या व नविन मिळकतीचे प्रत्यक्ष स्थळावर जाऊन मिळकतीचे आतुन मोजमाप घेऊन मिळकतीचा अंतर्गत नकाशा तयार करणे.

c. सर्वेक्षणामध्ये मोजमाप हे चौ. फुट/चौ. मी मध्ये घेणे.

d. सर्वेक्षण करतांना करमुल्यांकनाकरिता आवश्यक असलेली माहिती इमारतीचे मजले, बांधकाम वर्ष, बांधकामाची रचना, बांधकामाचे क्षेत्र, मालमत्ता वापराचा प्रकार, करपात्र क्षेत्र इ. माहिती गोळा करणे व प्रत्येक मिळकतीचे सर्वेक्षणाचे विवरण पत्र तयार करणे,

e. प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीचे डीजिटल फोटो काढणे.

f. निवड करण्यात आलेल्या निविदा धारकामार्फत आवश्यक असलेली माहिती जसे शौचालय सिट संख्या इ. संबंधित माहिती गोळा करण्यात येईल.

g. सर्वेक्षणाचा दर प्रती मालमत्ता २२३/- रु. पेक्षा जास्त नसावा.

३) सर्वेक्षणाचे संगणकात अद्यावतीकरण व कर मुल्यांकनाकरिता साहित्य पुरवठा :-

a. नगर परिषदकडे कर विभागासंबंधित उपलब्ध असलेल्या माहितीचे अद्यावतीकरण करणे, करआकारणी करण्याकरीता नगर परिषदने निश्चित केलेल्या वार्डाप्रमाणे व मिळकती प्रमाणे आज्ञावली अद्यावत करणे करमुल्यांकनाच्या प्रक्रीयेकरिता निविदाधारकाच्या सहाय्याने करण्यात आलेल्या मालमत्ता सर्वेक्षणाचा डाटा मिळकतीचे मजले, बांधकाम वर्ष, वापर, बांधकाम क्षेत्रफळ, करपात्र क्षेत्रफळ, खुल्या भुखंडाचे क्षेत्रफळ इत्यादी माहिती संगणक आज्ञावलीत अद्यावत करणे.

b. नगर परिषदद्वारे करमुल्यांकनाकरिता दरपत्रक तथा भांडवलीमुल्य आकारणी करीता मुल्यांकन यादी पुरविण्यात येईल. याप्रमाणे करयोग्य मुल्य किंवा भांडवली मुल्य पद्धत या दोन्हीपैकी जी नगर परिषद सुचविल त्याप्रमाणे आकारणी करणे गरजेचे आहे. करमुल्यांकनाच्या कामाकरीता निविदादारामार्फत संगणक आज्ञावलीत अद्यावतीकरण झाल्यानंतर मुख्याधिकारी यांनी सुचविल्याप्रमाणे व नियमाप्रमाणे प्रत्येक मिळकतींची मिळकत कर आकारणी पत्रक डिजिटल मिळकतीचा नकाशा, मिळकतींचा फोटोसह कलर प्रिंट काढून नगर परिषदला सुपुर्द करणे, नगर परिषदने सुचविलेल्या नमुन्यामध्ये प्रारुप कर मुल्यांकन यादी पुरविण्यात येईल.

c. नगर परिषदने दिलेल्या नमुन्यामध्ये मिळकत धारकांना सुधारित करमुल्यांकनाबाबत पुर्वसुचना नोटीसेस कलर मध्ये पुरविण्यात येईल. सुनावणीकरिता मिळकत धारकाव्दारे घेण्यात आलेल्या नविन सुधारित करमुल्यांकनाबाबत आक्षेप अर्ज नोंदवही तयार करणे, सुनावनीस मिळकत धारकास आमंत्रित करण्याची नोटीस प्रिंट करुन देणे इत्यादी साहित्य पुरवठा आवश्यक स्टेशनरी व बाईंडींगसह करणे. सुनावनी मध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे संगणक आज्ञावलीत अद्यावतीकरण करुन नगर परिषदने दिलेल्या नमुन्यामध्ये अंतिम करमुल्यांकन यादी नगर परिषदला आवश्यक स्टेशनरीसह पुरविण्यात यावी.

४) IWBP सॉफ्टवेअर मध्ये डेटा एन्ट्री करणे:

शासनाद्वारे महाराष्ट्रामधील सर्व नगर परिषद व नगरपंचायतींना आय.डब्ल्यु.बी.पी. पोर्टल वसुली विभागाच्या माहितीची साठवणुक करण्याकरिता पुरविण्यात आली आहे. निवडक एजन्सी फील्ड सर्व्हे पूर्ण करेल आणि कर आकारणीसाठी मालमत्तेशी संबंधित डेटा गोळा करेल आणि कर आकारणी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर नगर परिषदेद्वारे संपूर्ण कर आकारणी प्रक्रिया करेल, त्यानंतर वैयक्तिक कर निश्चित केला जाईल, मालक तपशील, इतर गोळा केलेली माहिती ही अंतिम डेटा सर्वेक्षणाच्या संपूर्ण माहितीच्याअद्ययावतीकरणासह IWBP पोर्टल वर एंट्री करण्याची जबाबदारी निवडलेल्या बोलीदाराची असेल.

५) कंत्राटदाराने सादर करावयाची कागदपत्रे (लिफाफा क्र. १):-

संकेतस्थळावर दिलेल्या जागेवर कंत्राटदाराने खाली नमूद केलेली कागदपत्रे लिफाफ्यामध्ये सादर करावीत.

a. कंत्राटदाराने कंपनी लेटर हेडवर परिशिष्ठ "अ" नुसार पत्र सादर करावे.
b. १०० रु. च्या स्टॅंप वर परिशिष्ठ "ब" प्रमाणे प्रमाणपत्र.
c. कंपनी नोंदणी प्रमाणपत्र.
d. संयुक्त उपक्रमाला परवानगी नाही.
e. मागील तीन वर्षाचा आयकर भरण्याचे प्रमाणपत्र.
f. जिएसटी प्रमाणपत्र.
g. ISO ९००१-२००८ Certification
h. कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी प्रमाणपत्र.
i. कर्मचारी विमा निगम प्रमाणपत्र.
j. प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीला विशिष्ठ क्रमांक नोंदविणे, मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीचे आतुन मोजमाप करणे, करण्यात आलेल्या मालमत्तेच्या प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे संगणकीय अद्यावतीकरण करुन माहीती तयार करणे, कर मुल्यांकन प्रक्रिये करिता मदत करणे, कर मुल्यांकन प्रक्रिये करिता आवश्यक नमुन्यात माहिति प्रिंट करुन आवश्यक स्टेशनरी व बाईडिंगसह पुरविणे इत्यादी कामाकरिता सहाय्य करणे, इत्यादी कामे महाराष्ट्र राज्यातील किमान ३ नगर पंचायत/ नगर परिषद किंवा १ महानगरपालिकाचे काम चालू व मागील वर्षात पूर्ण केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.
k. महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही नगरपरिषद / नगरपंचयात / महानगरपालिका क्षेत्रातील उच्च रिझोल्युशन इमेज घेण्याकरिता आणि त्यावर प्रक्रिया करण्याकरिता एजन्सीने Unmanned Arial Vahicle (UAV) ड्रोन या तंत्रज्ञानाचा वापर करून यापूर्वी किमान ३ नगरपरिषद / नगरपंचयात किंवा १ महानगरपालिका यांनी यशस्वीरित्या काम चालू व मागील वर्षात पूर्ण केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे व ते बंधनकारक आहे. केलेल्या कामाच्या प्रमाणपत्रात मालमत्ता क्रमांक देणे, मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीचे आतुन मोजमाप करणे, करण्यात आलेल्या मालमत्तेच्या प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे संगणकीय अद्यावतीकरण करुन माहीती तयार करणे, सर्वंकष कर मुल्यांकन प्रक्रिये करिता मदत करणे इत्यादि उद्देशाने अशा तंत्रज्ञानाचा वपर आणि अंमलबजावणी यांचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे.
l. निविदाधारकाकडे कर्मचारी संख्या इ.सी.आर नुसार ही सहा महिन्यापामुन सरासरी १२५ पेक्षा कमी नसावी व कर्मचाऱ्याची यादी पुरविण्यात यावी त्यामध्ये स्थापत्य इंजिनिअर, संगणक इंजिनिअर, सर्वेक्षक, सहाय्यक मर्वेक्षक असणे आवश्यक आहे.
m. निविदादाराचा ३ वर्षाची उलाढाल ही २ कोटी पेक्षा कमी नसावी.
n. महाराष्ट्रातील नगरपरिषदद्वारे ही एजन्सी काळ्या यादीत समाविष्ट केलेली नसावी, असे आढळयास निविदादाराची निविदा रद्द करण्यात येईल.

६) मुख्य निविदा पत्रक (लिफाफा क्र.२)

a. निविदाकाराने निविदा सादर करतेवेळी विधेयके (BOQ) कुठलीही चुकी न होता सादर करावीत. BOQ मध्ये कुठलेही खोडताड नसायला हवी. असे असल्यास BOQ रद्द केल्या जाईल. निविदाधारकाने निविदेमध्ये नमूद असणाऱ्या कामांसाठी एकत्रित प्रती मिळकत दर (GST व सर्व शासकीय करांसहित) ई-निविदेच्या दरपत्रकामध्ये (BOQ) नमूद करणे गरजेचे आहे.

७) ई-निविदा/ द्वी लिफाफा पध्दतीसाठी माहीतीपत्रक

सर्वप्रथम संकेत स्थळावर प्राप्त झालेल्या ई-निविदांचे लिफाफा क्र.१ उघडुन त्यात असणाऱ्या सर्व कागदपत्राची छानणी करुन निविदाधारकाव्दारे सादर केलेली कागदपत्रे ही निविदा मध्ये मागितलेल्या कागदपत्रासह पडताळणी केल्या जाईल. त्यामध्ये कुठल्याही कागदपत्रावर खाडाखोड केलेली नसावी. मुख्याधिकारी यांच्या मार्फत कागदपत्राची पडताळणी केल्या जाईल व मुख्याधिकारी यांना कुठलाही मुळ कागदपत्र हवा असल्यास ते निविदादारास सादर करावा लागेल. जर मुख्याधिकारी यांना कुठल्याही कागदपत्र खोटे आढळल्यास त्या निविदादारावर कायदेशिर कार्यवाही करुन काळया यादीत समाविष्ट केल्या जाईल. निविदाधारकाने डाऊनलोड केलेली ई-निविदा संकेत स्थळावर दिलेल्या निर्देशानुसार तसेच द्वी लिफाफा पध्दतीने ऑनलाईन जमा करावी. प्रस्तावाच्या प्रत्येक कागदपत्रावर निविदादाराच्या अधिकृत स्वाक्षरीकाराच्या स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. निविदा सादर केल्यानंतर कोणत्याही निविदादारास सुधारणा, बदली करता येणार नाही.

८) निविदा उघडण्याची पध्दत:

नगर परिषदेद्वारे प्रथम कागदपत्रांचा लिफाफा उघडण्यात येईल. निविदेमध्ये दिलेली सर्व कागदपत्रे निविदादाराने सादर केलेली असावी. निविदादाराने सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी करून ई-निविदा धारकांची / संस्थेची पात्रता ठरविण्यात येईल. आवश्यकतेनुसार कोणतेही कागदपत्र नसतांना निविदादारास पात्र नसल्याचे मानने जाईल व त्यांची निविदा विचारात घेतल्या जाणार नाही. सर्व निविदाकारांनी कामाच्या व्याप्ती मध्ये नमुद केलेले सर्व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. जर कागदपत्राची छाननी करतांना कुठलेही कागदपत्र नसल्यास निविदाकाराच्या निविदेस अपात्र ठरविण्यात येईल. ज्या निविदाकाराचे सर्व कागदपत्र योग्य असेल व कार्य व्याप्तीची पुर्तता केली असेल अशाच निविदाधारकांचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल. ज्या निविदाधारकाचा लिफाफा २ उघडण्यात येईल त्यांच्यापैकी ज्या निविदाधारकाचे दर सर्वात कमी असेल त्या निविदाधारकास सदर निविदेकरिता पात्र ठरविण्यात येईल.

लोणार नगर परिषद कडून धावते बिल रक्कम अदायगीचे टप्पे:-

| अ. क्र. | कामाचे विवरण | देयकाची टक्केवारी |
|---|---|---|
| | **मिळकतीचे सर्वेक्षण करुन माहिती गोळा करणे** | |
| ०१ | नगर परिषद हद्दीतिल प्रत्येक मिळकतीचे (इमारती व खुले भुखंड) पारंपारिक पद्धतीने सर्वेक्षण करण्याकरिता नगरपरिषदेस सहाय्य करण्यात यावे. त्यामध्ये मुख्याधिकारी यांनी दिलेले निर्देश व नियमांनुसार निविदा धारकांनी सामाजिक, आर्थिक सिमांकन करून झोन निश्चित करून त्या आधारे नगर परिषद हद्दीतिल मिळकती (इमारती व खुले भुखंड) जुन्या व नविन मिळकतीचे प्रत्यक्ष स्थळावर जाऊन मिळकतीचे आतुन मोजमाप घेऊन मिळकतीचा अंतर्गत नकाशा तयार करणे, सर्वेक्षण करतांना करमुल्यांकनाकरिता आवश्यक असलेली माहिती इमारतीचे मजले, बांधकाम वर्ष, बांधकामाची रचना, बांधकामाचे क्षेत्र, करपात्र क्षेत्र, मालमत्तेचा वापर, शौचालय शिट संख्या इ. माहिती गोळा करणे व प्रत्येक मिळकतीचे सर्वेक्षणाचे विवरण पत्र तयार करणे व प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीचे डीजिटल फोटो काढणे. काम पूर्ण केल्यानंतर. | १००% |
| | **प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतींना विशिष्ठ क्रमांक नोंदविणे** | |
| ०१ | नगर परिषद हद्दीचा भौगोलिक नकाश तयार करण्याकरीता नगर परिषद हद्दीमध्ये UAV Drone उडवून मालमत्तांचे व जमिनीचे हवाई छायाचित्र काढून नगर परिषद हद्दीचा भौगोलिक नकाशा तयार | ८०% |

| | | |
|---|---|---|
| | करून देण्यात यावा. नकाशावर नगर परिषदची हद्द आखणी, कर विभागाकरिता प्रभागाची आखणी नकाशावर करुन देण्यात यावी.<br>प्रत्येक मिळकतीला क्रमांकन करण्याकरिता प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीला विशिष्ठ क्रमांक देण्यात यावा, क्रमांकन करतांना मिळकतीची जुन्या व नविन मिळकतीची नोंदवही तयार करणे व प्रत्येक मिळकतींना नव्याने क्रमांकन करण्यात यावे. इ. काम पुर्ण केल्यानंतर व समाधान कारक असल्याची खात्री झाल्या नंतर | |
| ०२ | नविन नंबरची आखणी भौगोलिक नकाशावर करून प्रभाग दर्शक नकाशा व संपूर्ण शहराचा नकाशा तयार करून नगर परिषदेस सुपूर्द करणे, निवड करण्यात आलेल्या निविदा धारकामार्फत नगर परिषदेला आवश्यक असलेली इतर माहिती जसे सोलार सुविधा, रेन वॉटर हार्वेस्टिंग सुविधा, लिफ्ट बाबत माहिती, विहिर, हातपंप, अग्नि सुरक्षा सुविधा ई.संबंधीत माहिती, नगर परिषद मधील कर विभाग प्रमुख यांच्या सहाय्याने नगर परिषद हद्दितिल झोनची आखणी नकाशावर करणे इ. काम पूर्ण केल्यानंतर व समाधान कारक असल्याची खात्री झाल्या नंतर | २०% |
| **सर्वेक्षणाचे संगणकात अद्यावतीकरण व कर मुल्यांकनाकरिता साहित्य पुरवठा** | | |
| ०१ | निविदाकाराने कर आकारणी करण्याकरीता नगर परिषदने निश्चित केलेल्या वार्डाप्रमाणे व मिळकतीप्रमाणे करमुल्यांकनाच्या प्रक्रीयेकरिता निविदाधारकाच्या सहाय्याने करण्यात आलेल्या मालमत्ता सर्वेक्षणाचा डाटा मिळकतीचे मजले, बांधकाम वर्ष, वापर, बांधकाम क्षेत्रफळ, करपात्र क्षेत्रफळ, खुल्या भुखंडाचे क्षेत्रफळ व या व्यतिरिक्त सर्वेक्षणादरम्यान गोळा केलेल्या माहितीचे संगणक आज्ञावलीत अद्यावतीकरण करणे. व त्यांची हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी नगरपरिषद कर विभागास देणे. नगरपरिषदेद्वारे करमुल्यांकनाकरिता वार्षिक भाडे मूल्य किंवा भांडवलीमुल्य आकारणी करीता मुल्यांकन यादी पुरविण्यात येईल. याप्रमाणे करयोग्य मुल्य किंवा भांडवली मुल्य पद्धत या दोहोपैकी जी नगर परिषद सुचविल त्याप्रमाणे आकारणी करणे गरजेचे आहे. करमुल्यांकनाच्या कामाकरीता निविदादारामार्फत संगणक आज्ञावलीत अद्यावतीकरण झाल्यानंतर मुख्याधिकाऱ्याने सुचविल्याप्रमाणे व नियमाप्रमाणे प्रत्येक मिळकतींची मिळकत कर आकारणी पत्रक, डिजिटल मिळकतीचा नकाशा, मिळकतींचा फोटोसह कलर प्रिंट काढून नगर परिषदला सुपुर्द करणे, नगर परिषदने सुचविलेल्या नमुन्यामध्ये प्रारुप कर मुल्यांकन यादीचा पुरवठा केल्या नंतर. | ७०% |
| ०२ | नगर परिषदेने दिलेल्या नमुन्यामध्ये मिळकत धारकांना सुधारित करमुल्यांकनाबाबत पुर्वसुचना नोटीसेस कलर मध्ये पुरविण्यात येईल. सुनावणीकरिता मिळकत धारकाव्दारे घेण्यात आलेल्या नविन सुधारित करमुल्यांकनाबाबत तक्रार नोंदवही तयार करणे, सुनावनीस मिळकत धारकास आमंत्रित करण्याची नोटीस प्रिंट करुन देणे इत्यादी साहीत्य पुरवठा आवश्यक स्टेशनरी व बाईंडींगसह करणे. सुनावनी मध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे संगणक आज्ञावलीत अद्यावतीकरण करुन नगर परिषदेने दिलेल्या नमुन्यामध्ये अंतिम करमुल्यांकन यादी नगर परिषदला आवश्यक स्टेशनरीसह पुरविण्यात यावी मिळकत विभागाअंतर्गत येणाऱ्या न.प. च्या मालमत्तेच्या (गाळे तसेच इतर मालमत्ता) थकबाकी व चालू रक्कमेची नोंद करणे. | ३०% |
| **IWBP पोर्टल वर डेटा एंट्री करणे** | | |
| | नगर परिषदेकडून निवड करण्यात आलेल्या एजन्सी कडुन फील्ड सर्व्हे पूर्ण करण्यात येईल आणि कर आकारणीसाठी मालमत्तेशी संबंधित डेटा गोळा करण्यात येईल आणि कर आकारणी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर नगरपरिषदेद्वारे संपूर्ण कर आकारणी प्रक्रिया करून वैयक्तिक कर निश्चित केला जाईल. त्यानंतर एजन्सी मार्फत सर्वेक्षणामधील मालक तपशील, मजले निहाय क्षेत्रफळ, वापराचा प्रकार, बांधकाम वर्ष ई. गोळा केलेली माहितीची अंतिम डेटा एंट्री सर्वेक्षणाच्या संपूर्ण माहितीच्या अद्ययावतीकरणासह. IWBP पोर्टल वर करणे. | १००% |

९) सुरक्षा ठेव:

कार्यादेशाच्या वेळी निविदेच्या होणान्या एकूण रकमेच्या १०% बैंक गॅरंटी जमा करावी लागेल. सदर रक्कम काम पूर्ण होई पर्यंत राखून ठेवली जाईल व काम पूर्ण झाल्यास ६ महिन्यानंतर निविदा धारकाच्या मागणीनुसार अदा केली.

१०) नगर परिषद तसेच नगररचना विभागाकडून मंजूर निविदाधारकास पुरविण्यात येणारी माहिती

a. नगर परिषद हद्दितिल भाडे तत्वावर असलेल्या मिळकतींची भाडयाची यादी.
b. कर आकारणी करिता दर तक्ता.
c. नगर परिषदेस आवश्यक असलेली संपुर्ण प्रिंटीग स्टेशनरीचे नमुने
d. सर्व माहिती नगर परिषदेमध्ये संगणक वर टाकण्याकरिता व कर वसुली करिता आवश्यक असलेले सर्व हार्डवेअर पुरविण्यात येईल,

११) बयाणा रकम व कालावधी

ई-निविदा प्रीक्रियेत भाग घेण्यासाठी सोबत रुपये १५०,०००/-बयाणा रक्कम ऑनलाईन भरणे अनिवार्य आहे. मंजूर निविदाधारकांची बयाणा रक्कम कार्यदिश मिळाल्यानंतर निविदादारास परत करण्यात येईल.

१२) कामाचा करारनामा

मंजूर निविदाधारकाने विहित नमुन्यात शासकीय नियमाप्रमाणे मुद्रांक शुल्क भरून निविदेतील अटी व शर्तीनुसार करारनामा करून देणे बंधनकारक आहे.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद लोणार**

**परिशिष्ठ "अ"**

प्रति,

मा. मुख्याधिकारी,
नगर परिषद, लोणार

विषयः नगरपरिषद हद्दीतीलसंपुर्ण मिळकतीना (इमारती व खुले मुखंड) प्रत्यक्ष मिळकतीवर जाऊनप्रत्येक मिळकतीला विशिष्ठ क्रमांक नोंदविणे, मिळकतीवर जाऊन प्रत्येक मिळकतीचे आतुन मोजमाप करणे, करण्यात आलेल्या मालमत्तेच्या प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे संगणकीय अद्यावतीकरण करुन माहीती तयार करणे, कर मुल्यांकन प्रक्रिये करिता मदत करणे, कर मुल्यांकन प्रक्रियेकरिता आवश्यक नमुन्यात माहिति प्रिंट करुन आवश्यक स्टेशनरी व बाईडिंगसह पुरविणे इत्यादी कामाकरिता सहाय्य करणे.

महोदय,

मी खाली सही करणार जाहीर करतो की, संस्थेच्या नावावरील विषयांकित ई-निविदा खरेदी केली गेली असून मी ई-निविदेत नमुद केलेली कामे व कामाच्या अटी शर्तीचा अभ्यास करून सदरची ई-निविदा सादर करित आहे.सदर कामी ई-निविदेत लोणार नगरपरिषदेने नमुद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्या शर्तीनुसार काम करून देण्याची जबाबदारी माझ्यावर राहील. त्यामध्ये दिरंगाई झाल्यास नगर परिषद कडून होणा-या कारवाईस मी जबाबदार असेन.

आपला विश्वासू

ई-निविदा सादर करणा-या निविदाधारकाचे / कंपनीचे / संस्थेचे नावः-

ई-निविदा संचावर सही करणा-या निविदाधारक अधिका-याचे संपूर्ण नावः-

अधिका-याचा पदभारः-

पताः

## परिशिष्ठ "ब"

(प्रतिज्ञापत्र)

कारणे प्रतिज्ञापत्र निहून देतो की, नगर परिषद जाहिर ई-निविदा सुचना नुसार निविदेतील दर इतर निविदाधारकांपेक्षा कमी असल्यास निवेदेतील कामे करणे आवश्यक आहे.

उपरोल कामाबाबत मी / आम्ही याव्दारे असे नमुद करतो की, महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १६(१) (आय) व कलम ४४ (१) (ब) मधील तरतुदीनुसार आम्हांस माहीत असल्यानुमार आम्ही गंभीरपणे नमुद करतो की, लोणार नगरपरिषदेशी किंवा नगरपरिषदेच्या अधिन किंवा नगरपरिषदेत किंवा नगरपरिषदेच्या वतीने करण्यात येणा-या संविदेमध्ये नगर परिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा आमच्याशी भागीदारी नाही.

परंतु, महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १६(१) (आय) नुसार तरतुद केली असेल त्याच्या व्यतिरिक्त नगरपरिषदेच्या आदेशावरुन कोणत्याही कामात किंवा नगरपरिषदेशी किंवा नगरपरिषदेच्या अधिन किंवा नगरपरिषदेत किंवा नगरपरिषदेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत जिचा स्वतःचा किंवा आमच्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल, तसेच महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ४४ (१) (ब) नुसार अधिनियमातील कलम १६ चे पोटकलम (३), खंड (ब), (क), (ई) व (ग) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने कोणत्याही हिस्सा किंवा हितसंबंध असेल, मग अशा हिस्याची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो किंवा त्याच्या भागीदाराचा, प्रकर्त्याचा (प्रतिनिधीचा) किंवा इतर व्यक्तीच्या वतीने व्यवसायिकदृष्ट्या त्याचा हिन्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.

उपरोक्त प्रमाणे प्रतिज्ञापत्र लिहून दिले असे

दिनांक

(कंत्राटदाराची सही)

Signature Not Verified

Digitally signed by MAHESH BABURAO RATHOD
Date: 2026.05.14 14:01:07 IST
Location: Maharashtra-MH